सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

ग्राम विकास विभाग

**संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय**

४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सीबीडी-बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.

Website-https://mahaawaas.org

दूरध्वनी क्र.०२२-२७५६१८२४/ टोल फ्री क्र. १८०० २२ २०१९ Email ID-directoriayruralhousing@gmail.com


जा.क्र./SMURH/IT/बैठक/२०२४/०२ दि: ०१/०१/२०२४

प्रति,

**कार्यकारी अध्यक्ष,**
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद (सर्व).

**विषय :- ग्रामीण गृहनिर्माण योजना, १५ वा वित्त आयोग व राष्ट्रीय ग्रामस्वराज्य अभियान (RGSA) आढावा.**

उपरोक्त विषयान्वये, मा. प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग यांच्या अध्यक्षतेखाली **शुक्रवार, दिनांक ०५ जानेवारी, २०२४ रोजी** मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उपायुक्त (विकास), अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा व उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (पंचायत) यांची खालील वेळापत्रकानुसार व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे आढावा बैठका आयोजित करण्यात आल्या आहेत.

| अ.क्र. | विभाग | वेळ |
|---|---|---|
| १ | नागपूर, अमरावती व छत्रपती संभाजीनगर | सकाळी १०.०० ते दुपारी १२.०० वा. |
| २ | नाशिक, पुणे व कोंकण | दुपारी १२.०० ते दुपारी २.०० वा. |

**सदर विभागीय बैठकांसाठी विषय सूची पुढीलप्रमाणे आहे-**

१. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण.
२. मोदी आवास घरकुल योजना.
३. प्रधानमंत्री-जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (PM-JANMAN).
४. १५ वा वित्त आयोग.
५. राष्ट्रीय ग्रामस्वराज्य अभियान (RGSA) व पंचायत राज.

तरी वरील वेळापत्रकानुसार बैठकीसाठी आपण स्वत: उपस्थित रहावे व आपले अधिनस्त असलेले अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांना उपस्थित राहण्यासाठी आपल्या स्तरावरुन सूचित करावे, ही विनंती.

सदर बैठकीकरीता आवश्यक VC Link आपणांस अवगत करण्यात येईल.

**(डॉ. राजाराम दिघे)**
संचालक,
राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण
महाराष्ट्र राज्य

**प्रत:**

१. मा. प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा.विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व) यांना माहितीस्तव.
३. संचालक, पंचायत राज, महाराष्ट्र राज्य यांना माहिती व उपस्थित राहण्यासाठी.
४. उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व) यांना माहिती व उपस्थित राहण्यासाठी.
५. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व) यांना माहिती व उपस्थित राहण्यासाठी.
६. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, (सर्व) यांना माहिती व उपस्थित राहण्यासाठी.
७. उप मुख्य कार्यकारी अधिकारी, पंचायत (सर्व) यांना माहिती व उपस्थित राहण्यासाठी.